PIUS MEMORIAL HIGH SCHOOL

महाराष्ट्र शासन

क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०१/२०००)/(१)/प्राशि-३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : 29 जुलै, २०००.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे/नाशिक/कोल्हापूर/अमरावती/
नागपूर/औरंगाबाद

विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील २८ संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली च्या वर्गास ( फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००० पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्यांचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

२.१ सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

२.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनविषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापनपध्दती शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

PIUS MEMORIAL HIGH SCHOOL

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रिय अधिका-यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

३. शिक्षण उपसंचालकांनी संबंधित संस्थेस सक्षम अधिका-यामार्फत यथानियम शासनाची परवानगी कळविण्यापूर्वी खालील बाबी असल्याचे पडताळल्यानंतर

३.१ संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

३.२ संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३.३ सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

३.४ संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

३.५ संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

३.६ संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

३.७ शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

PIUS MEMORIAL HIGH SCHOOL

३.८ संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

३.९ संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

३.१० सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग, त्यातील विद्यार्थी, संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.

३.११ सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

३.१२ शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी घेण्यात आली आहे, ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

४. वरील परिच्छेद १ ते ३ मधील पडताळणी करुन विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सक्षम अधिका-यांमार्फत संस्थेस शासनाच्या परवानगीबाबतचा निर्णय कळवावा. जर यादीतील संस्थेने परिच्छेद ३ मधील कुठलीही अट पालन करण्यास असमर्थता दर्शविली तर संस्थेला दिलेल्या परवानगीचा फेरविचार तात्काळ करुन शासनास तसा अहवाल तातडीने पाठवावा.

५. तरी याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच वर उल्लेखिलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळांना प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

(वि.व. चिंदरकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
३) प्रशासन अधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका शिक्षण मंडळ,
४) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित
५) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव

निवड नस्ती, प्राशि-२

PIUS MEMORIAL HIGH SCHOOL

(सन २०००-२००१ या वर्षी (जून २००० पासून) इंग्रजी माध्यमाच्या नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०१/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै,२००० चे सहपत्र)

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण |
|---|---|---|
| | **जिल्हा - ठाणे** | |
| १. | तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, उस्मानाबाद, सेक्टर १२, नेरुळ, नवी मुंबई | सेक्टर कोपरखैराणे, नवी मुंबई |
| २. | मेस्को एज्युकेशन सोसायटी, ११०, नातालवाला बिल्डिंग, सावरकर मार्ग, माहिम,मुंबई | कौसा मुंब्रा, जिल्हा - ठाणे |
| ३. | विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण, तालुका - कोपरगांव, जिल्हा - अहमदनगर. | वाडा, जिल्हा - ठाणे |
| | **जिल्हा - पुणे** | |
| १. | राजगड ज्ञानपीठ, भोर, तालुका - भोर, जिल्हा - पुणे | भोर, जिल्हा - पुणे |
| २. | त्यागी एज्युकेशन सोसायटी, खडकी, पुणे-३ | खडकी, पुणे |
| ३. | केरला पिपल्स जवाहरलाल एज्युकेशन, वडगांव पिसोळी, पुणे | उंड्री-पिसोळी,पुणे |
| ४. | खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, राजगुरुनगर, तालुका - खेड, जिल्हा - पुणे | चाकण खेडोबाचामाळ तालुका - खेड, जिल्हा - पुणे |
| ५. | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे, येरंडवना पौड रोड, पुणे | खराडी, पुणे |
| ६. | आर.आर.फाउंडेशन इलेक्ट्रिकल न्यूमॅटिकल्स ॲन्ड हायड्रोलिक्स , इ-जी-७२, एम.आय.डी.सी., अंधेरी (पूर्व), मुंबई | वाकी, तालुका - खेड, जिल्हा - पुणे |
| ७. | महावीर प्रतिष्ठान, ४९१, गुलटेकडी, पुणे - ३७ | गुलटेकडी, पुणे |
| ८. | अमृता विद्यालय, नसरापूर, तालुका - भोर, जिल्हा - पुणे | नसरापूर, तालुका - भोर |
| ९. | इंद्रायणी विद्यामंदिर, तळेगाव दाभाडे, जिल्हा - पुणे | तळेगाव दाभाडे, जिल्हा - पुणे |
| १०. | साने गुरुजी शिक्षण संस्था, सय्यदनगर वाडी रोड, हडपसर, पुणे - २८ | हडपसर, पुणे |

PIUS MEMORIAL HIGH SCHOOL

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक :- नमाशा २००९ /(१५२/०९)/माशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ जुलै २००९.

शासन निर्णय :-

शासन परिपत्रक, दि. २९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांवर जिल्हा व राज्य समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. यापैकी इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळा सुरु करण्यासंदर्भात प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा व राज्य समिती, या दोन्ही समितीच्या शिफारशी आहेत अशा शाळांना सन २००९-१० पासून या शाळांमध्ये सुरु असलेल्या सर्व वर्गांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे. सदर शाळांची यादी शासन निर्णयासोबत जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय, दि. १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्यांच्याआत सुरु करणे बंधनकारक राहील, अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत असे गृहित धरले जाईल.

४. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमूद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमूद सर्व शाळांना माध्यमिक शाळा संहितेमधील तरतुदीनुसार प्रथम मान्यतेकरिता संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.- २००९०७२७१३०८०१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषदा
सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
मा.मंत्री (शालेय शिक्षण)यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
मा. सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहायक.
शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील कार्यासन अधिकारी-प्राशि-३/उमाशि-१/माशि-२
निवड नस्ती माशि-१

PIUS MEMORIAL HIGH SCHOOL

| अ. क्र. | | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | माध्यम | |
|---|---|---|---|---|---|

जिल्हा: पुणे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | | दि पुना गुजराती केळवणी मंडळ कसबा पेठ पुणे | दि. पूना गुजराथी केळवणी मंडळाची इंग्रजी माध्यमाची माध्यमिक शाळा | इंग्रजी | |
| २ | | वसंतराव सणस एज्यु.सोसा.स.नं. ३५ वडगाव खुर्द ता.हवेली, जिल्हा पुणे. | ग्रीन एकर्स इंग्लिश मिडीयम स्कूल, वडगाव खुर्द तालुका हवेजी, जिल्हा पुणे . | इंग्रजी | |
| ३ | | सोना एज्युकेशन सोसा.फुरसुंगी ता.हवेली, जिल्हा पुणे. | सोना आई इंग्लिश मिडीयम स्कूल, भेकराई नगर सासवड रोड, फुरसुंगी, पुणे ४१२ ३०८. | इंग्रजी | |
| ४ | | प्रतिभा शि.सं. ओतूर ता.जुन्नर | कपर्दिकेश्वर सेकंडरी स्कूल, ओतूर ता.जुन्नर | इंग्रजी | |
| ५ | | राजगड ज्ञानपीठ भोर, जिल्हा पुणे. | जिजामाता इंग्लिश मिडीयम स्कूल, भोर, तालुका भोर, जिल्हा पुणे. | इंग्रजी | |
| ६ | | द सिस्टर ऑफ चॅरीटी सोसा.गट क्रमांक १५९, वाकी चाकण तालुका खेड, जिल्हा पुणे. | पायस मेमोरियल स्कूल, (माध्यमिक) मु. पो वाकी खुद तालुका खेड, जिल्हा पुणे. | इंग्रजी | |

६ शाळा